राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई या आयोगातील प्रबंधक (विधी) या न्यायीक सेवेतील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबत....

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१८२/ग्रासं-४,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.
दि.२५ ऑक्टोंबर, २०१७

वाचा:-

१) शासन निर्णय, क्र.संकीर्ण२०१७/प्र.क्र.८४/ग्रासं-४, दि.०६.०६.२०१७
२) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.राआ/महा/आस्था-३-२०१७/५१६३, दि.२८.०९.२०१७.

प्रस्तावना:-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने श्री.विलास व.गायकवाड, महानगर दंडाधिकारी यांची प्रबंधक (विधी) या पदावर संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये पदस्थापना करण्यात आली होती. श्री.गायकवाड प्रबंधक (विधी) यांची मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची बदलीने पदस्थापना अन्यत्र केली असल्याने सदर रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याकरिता श्री.भारत मारोती माने, महानगर दंडाधिकारी यांची पदस्थापना करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालयाने राज्य आयोगास केली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या शिफारसीनुसार राज्य आयोगाने श्री.भारत मारोती माने यांची प्रबंधक (विधी) या रिक्त पदावर पदस्थापना करण्याची विनंती संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये केली आहे. यास्तव, श्री.भारत मारोती माने यांची प्रतिनियुक्तीने राज्य आयोगाच्या आस्थापनेवर प्रबंधक (विधी) या रिक्त पदावर पदस्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांच्या आस्थापनेवर प्रबंधक, (विधी) या रिक्त पदावर न्यायीक सेवेतील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची शिफारस प्रबंधक (प्रशासन), मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्य आयोगास केली आहे. त्यानुसार राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या आस्थापनेवर प्रबंधक, (विधी) या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अ.क्र.	न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पद	पदस्थापनाचे पद
१	श्री.भारत मारोती माने, महानगर दंडाधिकारी, १४ वे न्यायालय, गिरगांव, मुंबई.	प्रबंधक (विधी) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.

२. वरील, बाबीसाठी होणारा खर्च मागणी क्र.एम-२ “२४०८-अन्न साठवण व वखार साठवण (०४)(००) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य ग्राहक संरक्षण परिषद, राज्य आयोग आणि जिलहा मंचाची स्थापना (०४)(०१) मुंबई शहर दत्तमत (२४००२५१) (०१) वेतन (०४)(०१) वेतन (०४)(०२) मुफसल (२४०८०२६२)” सर लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा प तो मंजूर अनुदानातून भागवावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२५१६३२३०७२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Raju Kalluji Narpande

Digitally signed by Raju Kalluji Narpande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=F.C.S and C.P, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c9bb69da44e8b03c93d1a880163547bbb4787f2f2839b6277a288182cbf623cb, cn=Raju Kalluji Narpande
Date: 2017.10.25 16:23:05 +05'30'

(राजू क.नरपांडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
३. मा.विरोधी पक्षनेता, (विधनसभा/विधानपरिषद)
४. मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
५. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव.
६. मा.महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व परीक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई/नागपूर.
१०. प्रबंधक, (प्रशासन) राज्य ग्राहक तक्रार निवरण आयोग,मुंबई.
११. श्री.भारत मारोती माने, महानगर दंडाधिकारी, १४ वे न्यायालय, गिरगांव, मुंबई.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. उप सचिव (ग्रासं-४), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
१४. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मुंबई
१५. निवडनस्ती.